# शैक्षणिक अहवाल २००६-०७

आमची रा.भा.शिर्के प्रशाला ही रत्नागिरी जिल्हयातील एक अग्रगण्य शाळा असं म्हणताना खरोखरच आनंद व अभिमान वाटतो. २००६-०७ सालातहीवार्षिक अहवालसादर करतानाविशेष आनंद होत आहे.

१. रत्नागिरी जिल्हयात शिक्षण विभागाने प्रथमच घेतलेल्या सानेगुरुजीगुणवत्ता अभियानात केंद्र,तालुका आणिजिल्हाया तीनहीस्तरावरशहरी विभागात प्रथम क्रमांक प्राप्त करणाऱ्या आमच्या शाळेने कोल्हापूर विभागामध्ये स्वच्छ ,सुंदरव उपक्रमशील शाळा या स्पर्धात्मक उपक्रमातही प्रथम क्रमांक प्राप्त करुन प्रशालेने विभागातील सर्वोच्च मानाचा तुरा आपल्या शिरपेचात खोवला आहे.

२. कोणत्याही विद्यालयाच्या मानदंड म्हणजे एस.सी.सी.चानिकाल.तिथूनच आमच्या यशोमंदिराची वाटचालसुरुहोते .मार्च २००६ मध्ये झालेल्या शालान्त परीक्षेत २४३ विद्यार्थी प्रविष्ट झाले. त्यापैकी २२३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले.विद्यालयाचा निकाल ९१.७६% इतकालागला.विशेष योग्यता श्रेणी ४७,तर प्रथम श्रेणी ८४ विद्यार्थ्यांना प्राप्त झाली.विद्यालयात प्रथम कु.नेहा देवेंद्र भोगले ९२.२३% (मेरीट लिस्टमध्ये २२ वी) ,व्दितीय कु.शुभदा सुर्वेव कु.कौस्तुभ काळे ९१.८६%,तृतीय क्रमांक कु.नाईकसुहेल्लाव अनुप जोगळेकर ९१.७३% क्रमांक हया दोन विद्यार्थ्यांनी प्राप्त केला. बहुसंच पध्दतीच्या प्रश्नपत्रिका असूनही विद्यार्थ्यांनी स्पृहणीय यश मिळविले.एकूण विद्यालयाचा इ.५वी ते ९वी वीचानिकाल ९५.८% लागला. एस.सी.सी.बोर्डाच्या राष्ट्रीय शिष्यवृत्तीसाठी १२ विद्यार्थी प्राप्त ठरले.

३. चतुरंग प्रतिष्ठान,मुंबई च्या सर्वोतम विद्यार्थी गोडबोले पुरस्काराची कु.मानसी श्रीकांत पटवर्धन ही मानकरी ठरली.यावर्षीचा प्रशालेचा आदर्श विद्यार्थी पुरस्कार कु.स्वप्नील सुशील दाभोळकर हयाला मिळाला.कु मानसी श्रीकांत पटवर्धन हिची प्रशालेची आदर्श विद्यार्थिनी म्हणून निवड झाली.

४. यावर्षी माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत ४५ विद्यार्थी सहभागी झाले. कु.खेरहर्ष हेमंत (१३ वा ),कु.पवार मानस दिनकर (२० वा) ,कु.जाधव ओंकार (२१ वा),कु.बेळेकरवृषाली (२६ वी ) या ४ विद्यार्थ्यांनी गुणवत्ता यादीत क्रमांक मिळविले.माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेचे मार्गदर्शन श्री.शेलार ,श्री.देवळेकर यांनी केले.

५. अहवालवर्षात रत्नागिरीजिल्हाविज्ञानशिक्षक मंडळातर्फे घेण्यांत आलेल्या विज्ञानरंजन स्पर्धेत इ.५वी ते १०वी मधील १०८ विद्यार्थी सहभागी झाले.त्यांना विज्ञानशिक्षिका सौ.पाटील मॅडम व श्री.आयरे एस.वाय.यांनी मार्गदर्शन केले.

तालुकाविज्ञान प्रदर्शनात मुख्य विषय निरंतर ऊर्जाविज्ञान विषयांतर्गत सौर ऊर्जेवरवाहतूक ,या विषयावर प्रकल्प सादर केला.श्रीमती पिलणकर ,श्री.कांबळे के.डी. वसर्वविज्ञानशिक्षकांनी सहभाग घेतला.

६. टिळक महाराष्ट्र विद्यापीठ,पुणे यांच्या इंग्रजी विषयाच्या पुढीलप्रमाणे परीक्षा घेण्यांत आल्या.

| | | | |
|---|---|---|---|
| प्रिएलिमेंटरी परीक्षा | ३५ विद्यार्थी प्रविष्ट | ३४ उत्तीर्ण | ९७.१४% |
| एलिमेंटरी परीक्षा | २५ विद्यार्थी प्रविष्ट | २४ उत्तीर्ण | ९६.००% |
| ज्युनियर परीक्षा | ६७ विद्यार्थी प्रविष्ट | ६० उत्तीर्ण | ८९.५५% |

या परीक्षांना श्रीम.पूनम जाधव ,श्री.कांबळे आर.वाय. ,श्रीम.कोळपे वश्री.गद्रे यांनी मार्गदर्शन केले.

७. महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा,पुणे यांच्या राष्ट्रभाषा सुबोध परीक्षेस ४०पैकी ३८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले.श्रीम.कोकरे यांनी सदर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. बालबोधिनी परीक्षेला ५५ पैकी ५५ विद्यार्थी उत्तीर्णव प्राथमिक परीक्षेला ५८पैकी ५८ उत्तीर्ण झाले.प्रवेशिका परीक्षेत १६ पैकी १६ उत्तीर्ण झाले.सहभागी विद्यार्थ्यांना सौ.कानविंदे,सौ.श्वेता कांबळेवसौ.बागवे यांनी मार्गदर्शन केले.

८. मराठा मंदिर,महाराष्ट्र ज्ञानपीठ संस्कृत परीक्षा पाठांतर ३६ बसलेसर्व उत्तीर्ण,प्रथम २० बसले २० उत्तीर्ण,व्दितीया ४८ बसले ४७ उत्तीर्ण,तृतीया परीक्षेला ३६ बसले ३४ उत्तीर्ण .तृतीया परीक्षेत कु.चैताली साटम विद्यापीठात तिसरी आली.या विद्यार्थ्यांना सौ.घैसास,सौ.घाटे,सौ.आगाशे,श्री.पडवेकर यांनी मार्गदर्शन केले.

९. गणित अध्यापक महामंडळाच्या गणित प्राविण्य परीक्षेस इ.५वीचे ४० विद्यार्थी बसले.कु.अक्षय प्रमोद मारुलकर - ६वी प्रविण्य परीक्षेस पात्र झाला.यांना सौ.साखळकरव श्री.रमेश ढोले यांनी मार्गदर्शन केले.महाराष्ट्र ज्ञानपीठ गणित दुसरी परीक्षेचा ९६% निकाललागला. विद्यालयात ५वी मधील कु.पांचाळ अमेय ,बंगे काजल,भोगले ऐश्वर्या यांनी प्रथम,व्दितीय,तृतीय क्रमांक प्राप्त केला.तिसरीगणित परीक्षेला ४० मुले बसली.१०० टक्केनिकाल लागला.मार्गदर्शन श्री.पडवेकर,श्रीम.आगाशे यांनी केले.

१०.कोकण प्रज्ञाशोध परीक्षा २००६ साठी १७५ विद्यार्थी प्रविष्ट झाले.श्री.रहाटेसर,श्री.चव्हाण सर,श्री.ढोले सर,श्री.आर.वाय.कांबळे सर यांनी मार्गदर्शन केले.

११. महाराष्ट्र प्रज्ञाशोध परीक्षेला विद्यार्थी,तर राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षेत विद्यार्थी प्रविष्ट झाले.त्यांना श्री.कांबळे के.डी.यांनी मार्गदर्शन केले.

१२.विविधांगी व्यक्तिमत्व घडविण्यासाठी विद्यार्थ्यांना कला विषय आवश्यक असतात.विद्यालयातील कलाशिक्षक श्री.लिंगायत यांच्या उत्कृष्ट मार्गदर्शनामुळेच विविधचित्रकला स्पर्धामधून विद्यार्थी उल्लेखनीय यश प्राप्त करतात.

*रत्ना.तालुका कला अध्यापक संघ (२८६ विद्यार्थी),*शासकीय बालचित्रकला स्पर्धा(४९५विद्यार्थी),*शासकीय एलिमेंटरी (३९ विद्यार्थी)व इंटरमिजिएट ग्रेड परीक्षा(९ विद्यार्थी),एलिमेंटरीसाठी सुप्रिया पानसरे वश्रीकला उंदरे यांना ए ग्रेड प्राप्त झाली.एलिमेंटरीला प्रियांका जोशीहिला ए ग्रेड मिळाली.*सामाजिक वनीकण जिल्हास्तरीय चित्रकला स्पर्धेतही १०५ विद्यार्थी सहभागी झाले.या सर्वाना श्री.लिंगायत यांनी मार्गदर्शन केले.

जिल्हा परीषद बालकल्याण हुंडाबंदीदिनानिमित्त चित्रकला स्पर्धेत १५ विद्यार्थी सहभागी झाले.

प्रभम सिध्दार्थ पिलणकर,द्वितीय रुबीया काद्री,शोण गंगाई,माध्यमिक शिक्षण विभागाच्या वतीने घेण्यात आलेल्या जिल्हास्पर्धेत ८ विद्यार्थी सहभागी ३००/- चे तृतीय पारीतोषिक कु.हर्षन भोपी याने मिळवले.सकाळ पेपर्स लि.च्या राज्यस्तरीय बालकुमार चित्रकला स्पर्धेत ४७ विद्यार्थी सहभागी झाले.

१३.विद्यालयातील कीडा विभागही सक्षम असून ,या विभागातील विद्यार्थ्याचा सहभाग आणि यश म्हणजे विद्यालयाच्या यशातील मानाचा शिरपेच आहे असेगौरवाने म्हणता येईल.यावर्षी फुटबॉल,हॉलीबॉल,खो-खो,बास्केटबॉल,बॅडमिंटन,किकेट,कुस्ती,बुध्दीबळ,कॅरम,कबडडी आणि मैदानी स्पर्धेमधून प्रशालेचे संघ सहभागी झालेहोते.विविधखेहातून एकूण २७ विद्यार्थी राजस्तरीय स्पर्धेत सहभागी झाले होते.राष्ट्रीय सतरावर३ विद्यार्थी सहभागी झाले.

१)स्नेहलसावंत ६ अ(बॅडमिंटन) २)अनिरुध्द पटवर्धन ९ अ (बॅडमिंटन) ३)मैत्रेयी गोगटे ७ वी(कॅरम)

श्री.मयेकर ,सौ.कांबळे मॅडम वश्री.गद्रेसरहे मार्गदर्शन करतात.

१४.विद्यार्थ्याच्या सुप्त गुणांचाविकास करण्याचे जवाहि-याचे काम म्हणजे स्पर्धा विभाग .विविधस्तरावरीलविविध स्पर्धाची माहिती विद्यार्थ्याना देऊन त्याची निवड करुन प्रोत्साहन देण्याचे काम हा विभाग करतो.श्री.राजेद्र माळगे,सौ.पवार मॅडम या विभागाचे काम पहातात.

सन २००६-०७मधील नगर परीषद कथकथन स्पर्धा प्रथम क्रमांक कु.सना कुरेशी,द्वितिय क्रमांक कु.स्नेहा जोशी.लहानगटात कु.अनुजा आखाडे प्रथम क्रमांक कु तेजलचव्हाण द्वितीय क्रमांक कु.मृणाल ढोल तृतीय क्रमांक मिळाला तर पठण स्पर्धेत लहानगटात कु.भक्ती दामले हिला प्रथम क्रमांक मिळाला

जिल्हा परीषद बालकल्याण हुंडाबंदीदिनानिमित्तवक्तृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांक कु.पल्लवी गोसावी , द्वितिय क्रमांक कु.प्रियांका चोपदार, तृतीय क्रमांक कु.स्वप्नाली चव्हाण यांना मिळाला.

गीता मंडळ सुलेखन स्पर्धेत कु.अश्विनीवालम प्रथम क्रमांक तर सामाजिक वन विभागाच्या तालुकास्तरीय निबंध स्पर्धेत कु.प्रियांका पांचाळ यांना प्रथम क्रमांक मिळाला.

प्रशांत दामले  फॅन फाऊंडेशन प्रथम निवडस्तर प्रथम कमांक कु.प्रेरणा दामले हिने मिळवला.तिने पुणे येथील दुस-या फेरीत सहभाग घेतला.

जीवन विजय प्रतिष्ठानच्या महाबुध्दीमान स्पर्धेत १८ विद्यार्थी सहभागी झाले.शालेय स्तरलो.टिळकवक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली.

हस्ताक्षर स्पर्धेत इ.५ वी ते ७ वी मधील ११५ विद्यार्थी सहभागी झाले होते.प्रथम क्रमांक कु.हर्षदाखांडेकर ,द्वितीय क्रमांक कु.प्रतिभा बयवंत तृतीय क्रमांक दीप्ती सावंत यांनी मिळवला.

एलिट ग्रुप रत्ना.वक्तृत्व स्पर्धेत कु.तेजलचव्हाणने तृतीय क्रमांक मिळवला.

क्रांतिकारकांच्या कथाकथन स्पर्धेत ा कु.तमन्ना शेखव कु.स्वरदा कोकजे यांना द्वितीय क्रमांक मिळवला.

र.ए.सोसायटीच्या कालिदास स्मृती समारोहाच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त पठण स्पर्धेत ५२ विद्यार्थी सहभागी झाले. प्रथम क्रमांक कु.गुजंन मालगुंडकर, द्वितीय क्रमांक कु.मृणाल ढोले तृतीय क्रमांक कु.मयुरी सावंत यांना मिळाला.

जागतिक लोकसंख्या वाढ इशाारादिनानिमित्त जिल्हानिबंध स्पर्धेत १३ विद्यार्थ्यांनी सहीाागघेतला .प्रथम क्रमांक कु.कस्तुरी भांबीड,द्वितीय क्रमांक कु.अमेय राणे,तृतीय क्रमांकस्नेहा शिवलकर यांनी प्राप्त केला.

शिक्षण मंडळ कराड राज्य वक्तृत्व स्पर्धेत कु.तेजलसुहासचव्हाणहिने तृतीय क्रमांक मिळवला.

१५.विद्यालयातील महाराष्ट्र छात्रसेना विभागातील मुलांसाठी श्री.माळगे सर तर मुलींसाठी सौ.वंदनाघैसास मार्गदर्शन करतात.इ.८ वी मध्ये ६३ मुले व ६१ मुलगे तर ९ वी मधील ४६ मुले व ५२ मुली सहभागी आहेत.

१५ ऑगस्ट व २६ जानेवारी  - मानवंदनासंचलनात विद्यार्थ्यांचा सहभाग असतो

राजीवगांधी जयंती दौड मध्ये प्रशालेतील विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन सद्‌भावना गीतसादर केले.

ध्वजनिधी संकलनामध्ये विद्यार्थ्यांनी उत्तम सहभाग ,पल्स पोलिओ अभियानासाठी १२ विद्यार्थ्यांची स्वयंसेवक म्हणून निवड,अंधनिधिसाठी ५००० रुपयांचा निधीसंकलित केला.

१६.विद्यालयाचा एन.सी.सी.विभाग म्हणजे एकशिस्त संपन्न विभाग यात ५० विद्यार्थी सहभागी असून तयाना कोल्हापूर विभागाच्या २ महा नेव्हल युनिट अंतर्गत प्रशिक्षण दिले जाते.त्यांना चिफ ऑफिसर श्री.सी.एस.पाटील मार्गदर्शन करतात.

१७.विद्यालयात स्काऊट - गाईड विभाग उत्तमरितीने कार्यरत आहे.

सर्वाधीक पथक नोंदणीवसर्वाधिकखरी कमाई संकलनाची बक्षिसे तसेचजिल्हा मेळाव्यातील विद्यार्थ्यांचे उल्लेखनीय यश ही या विभागाची जमेची बाजू.या विभागात सौ.कानविंदे ,श्रीम.शिर्के,श्रीम.जाधव,सौ.साखळकर,सौ.बागवे,सौ.कोळपे,श्री.माळगे,श्री.आयरे,श्री.चव्हाण,श्री.देवळेकर,श्री.पोव ाार हेसर्व मार्गदर्शन करतात.जिल्हा मुख्यालय आयुक्त म्हणून श्री.एस.एम.कांबळे सरवजिल्हासचिव म्हणून श्री.देवळेकरसर कार्यरत आहेत.

शालेय व्यवस्थापन करताना उत्तम नियोजन आणि कार्यवाहीसाठी अनेक विभागातून विद्यालयातील शिक्षक काम करतात.

१.स्वराज्य सभा विभाग-प्रमुख श्री.रमेश चव्हाणहे दुपार सत्राचे प्रमुख म्हणून काम पहातात व श्रीमती कोळपे या सकाळसत्रातील स्वराज्य सभा प्रमुख म्हणून काम पहातात.या विभागामार्फत पुढील कार्यक्रम पार पडले.विद्यार्थी-विद्यार्थिनी प्रतिनिधी निवडणूक,गुरुपौर्णिमा,लो.टिळक पुण्यतिथी,म.गांधी आणिलालबहादूरशास्त्री जयंती,रक्षाबंधन,संस्कृत दिन,स्वयंशासन दिन,स्नेहसंमेलन.

२.सांस्कृतिक विभाग-स्वराज्य सभेला सतत सहकार्य देणारा पूरक विभाग म्हणजे सांस्कृतिक विभाग.स्वराज्य सभेने आयोजित केलेल्या कार्यक्रमांचे व्यवस्थापन सांस्कृतिक विभाग करतो.श्री.के.डी.कांबळेहे दुपार सत्राचे विभाग प्रमुख ,तरसकाळसत्राचे आयरे एस्.वाय्.आणि श्रीमती साखळकरहेसांस्कृतिक विभाग म्हणून काम पहातात.

३.विद्यालयामार्फत दरवर्षीहस्तलिखित तयार केले जाते.विद्यार्थ्याकडून अनेकविषयावर लेखन मागविले जाते.त्यातून उत्तम हस्ताक्षरअसणा-या विद्यार्थ्याकडून हस्तलिखित तयार केले जाते.यावर्षी श्रीम.बागवे,श्रीम.गांधी,श्रीम.कानविंदे,श्री.पडवेकर,श्री.लिंगायत यांनी काम पाहिले.

४.विद्यालयात सुसज्ज प्रयोगशाळा असून श्री.विजापुरे हे प्रयोगशाळा सहाय्यक म्हणून काम पहातात.

५.विद्यालयात अनेकग्रंथ आणि संदर्भकोश ,विविध वर्तमानपत्रे असलेलेसुसज्ज ग्रंथालय असून विद्यार्थी आणिशिक्षकांना त्याचा लाभ घेता येतो.हे काम श्रीमती.चव्हाण उत्तम रितीने पहातात.

६.विद्यार्थ्यांना बचतीची सवय लागावी ,राष्ट्रीय कार्यात शाळेचासहभाग म्हणून विद्यार्थ्यांचे बचतखातेसुरु आहे. हे काम श्रीमती चव्हाण उत्तम रितीने पहातात.

७.शाळेतील गरीब ,होतकरु विद्यार्थ्यांना विद्यालयातील गरीब विद्यार्थी निधी योजनेंतर्गत यावर्षी सुमारे १५ हजार रुपये मदत केली आहे.अनेक विद्यार्थी उत्स्फूर्तपणे आपल्यावाढदिवसानिमित्त या निधीला हातभार लावतात.हे.काम श्री.देवळेकर पहातात.

८.वार्तापफलक लेखनाच विद्यालयाच्या प्रवेशद्वारापासून विद्यालयातील विविध उपक्रमांची ओळख होते.इ.८ वी अ आणि ७ वी क मधील विद्यार्थी फलक लेखनाचे नियमित काम करतात.त्याना श्रीमती सप्रे आणि श्रीमती बागवे मार्गदर्शन करतात.

९. विद्यालयात पुस्तकपेढी योजना कार्यान्वित असुन या विभागाचे काम श्रीमती कोळपे आणि श्रीमती शिर्के पहातात.

१०. विद्यालयातीलशिक्षक -पालक संघाचे काम श्री. श्री.देवळेकर पहात असून पालकांकडून चांगले सहकार्य मिळत आहे.

११.वार्षिक पारितोषिक आणिगुणगौरव विभाग श्रीमती.पाटील,श्रीमती.कांनविंदे,श्री.कांबळे आर.वाय.हे पहात आहेत.

१२.सहल विभाग श्री.पाटील सी.एस.वविनोद मयेकर हे पाहातात. गंधर्व पार्क, मालवण सिंधुदूर्ग,रायगड,महाबळेश्वर,प्रतापगड या ठिकाणीसहली गेल्या.या सहलीमध्ये ३५० विद्यार्थी सहभागी झाले.

अहवालवर्षातील महत्वाच्या घटना-

१.तालुका विज्ञान प्रदर्शन परीक्षक म्हणून श्री.रहाटे यांची पाच वर्षासाठीनिवड.

२.प्रशालेतील इ.५ वीव ६ वीतील काही विद्यार्थी गुरुकुल प्रकल्पामध्ये सहभागी झाले.विभाग प्रमुख म्हणून श्री.राजेश आयरे काम पाहतात.

३.शैक्षणिक गुणवता कार्यकमांतर्गत इ.७ वी (माध्यमिक शिष्यवृत्ती) व १० वी बोर्ड परीक्षेचे विद्यार्थी,पालक यांच्यासाठी तज्ञ मार्गदर्शकांचे उदबोधनवर्गाचे आयोजन करण्यात आले.प्रा.सोमण(पुणे)व श्री.वाघमारे(लातुर)यांची व्याख्याने संपन्न झाली उदबोधनवर्गाचे आयोजन आमच्या र.ए.सोसायटीतर्फे करण्यात आले.या गुणवत्तासुधारणा प्रकल्पाचे प्रमुख म्हणून संस्थेचेसहकार्यवाह श्री.देवळेकरसरहे काम पहातात.

४.साने गुरुजी कथामाला जिल्हा रत्नागिरी शाखेतर्फे यंदाचा(२००६)माध्यमिक शिक्षकांसाठी 'सानेगुरुजी आदर्शशिक्षक पुरस्कार'प्रशालेतील ज्येष्ठ शिक्षकश्री.देवळेकर यांना प्रदान करण्यात आला आहे.ही प्रशालेच्या दृष्टीने अत्यंत आनंदाचीगोष्ट आहे.

५.कु.अक्षय प्रमोद मारुलकर या विद्यार्थ्याने दै.लोकसत्तातर्फे आयोजित 'गाथा ज्ञानाची'या स्पर्धेत मुबंई विभागात प्रथम क्रमांक पटकावला.

६.कु.तेजल सुहासचव्हाण (इ.५वी)ही राज्यस्तरीय कथाकथन स्पर्धेत यशस्वी ठरली.

---

'माझ्या मनामध्ये मोठे होण्याची फार हाव आहे.प्रत्येक बाबतीत मी मोठा व्हावे असे मला नेहमी वाटते...केवळ थोर पुरुषांकडे पाहुन मला हेवाटते असे नाही.केवळ मनापासून वाटत आहे.ज्या कोकणातूनविशेषतः रत्नागिरीजिल्हातून लोकमान्यांसारखे ,गोखल्यांसारखे महापुरुष निर्माण झाले.कोकणातीललोकांचीस्थिती काय

आहे ?जिकडेतिकडे अज्ञान भरले आहे.लोकांचेचांगले पाहण्याची त्यांच्यामध्ये शक्ती नाही.हा त्यांचा दोष नाही.हा त्यांच्या आज्ञांचा,अशिक्षितपणाचा दोष आहे.रत्नागिरी जिल्हयामध्ये प्रत्येक डोके उत्तम सुपीक आहे.तेथे पुरेशा शाळा नसाव्यात,एकसुध्दा कॉलेज नसावेहीगोष्ट त्या जिल्हयाला लांछनास्पद आहे. परंतु याचे करण एवढेच की,तेथूनशिक्षणाकरिता एकदालोक बाहेतर आले की मग फिरुन तेथे पैशाच्या दृष्टीने सहाय्य काही नाही,यामुळे म्हणा परत - कोकणात जाण्याची कोणासही बुध्दीहोत नाही .

- कै.अरुअप्पा जोशी यांच्या पत्रातून.